# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)

# २०१५

## (पेपर क्र. १)

**विषय - भाषा (मराठी) व इंग्रजी**

**माध्यम : मराठी**

१. क्षेत्रनिहाय व घटकनिहाय महत्त्वांश

२. अभ्यासक्रमातील बदल

३. प्रश्नपत्रिका आराखडा

४. उत्तरसूची

# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)

## घटक निहाय महत्त्वांश

## विषय - भाषा (मराठी) व इंग्रजी

**माध्यम : मराठी** **एकूण गुण - 100**

**विभाग - I** **विषय - मराठी** **एकूण गुण - 70**

| क्र. | घटक (उपक्षेत्र) | उपघटक | कमाल प्रश्न | किमान प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1. | साहित्याचा आस्वाद | उतारा व त्यावर आधारित प्रश्न | 3 | 3 |
| | | कविता व त्यावर आधारित प्रश्न | 3 | 3 |
| | | संवाद व त्यावर आधारित प्रश्न | 3 | 3 |
| | | सुसंगत वाक्याचा परिच्छेद (गाळलेले शब्द भरुन सुसंगत परिच्छेद तयार करणे.) | 3 | 3 |
| 2. | शब्द विचार | शब्दांच्या जाती - नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद | 2 | 2 |
| | | लिंग | 1 | 1 |
| | | वचन | 1 | 1 |
| | | विरामचिन्हे | 1 | 1 |
| | | उपसर्ग/प्रत्यय लावून अर्थपूर्ण शब्द | 2 | 2 |
| | | समानार्थी शब्द | 1 | 1 |
| | | विरुद्धार्थी शब्द | 1 | 1 |
| | | जोडशब्द | 1 | 1 |
| | | ध्वनीदर्शक/पिलूदर्शक/घरदर्शक शब्द | 1 | 1 |
| | | शब्दसमूहाबद्दल एक शब्द | 1 | 1 |
| | | समूहदर्शक शब्द | 1 | 1 |
| | | अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार करणे. | 1 | 1 |
| | | शब्दकोशातील वर्णानुक्रमे शब्दक्रम लावणे. | 1 | 1 |
| | | एकाच शब्दाचे भिन्न अर्थ शोधणे. | 1 | 1 |
| 3. | वाक्य विचार | काळ | 1 | 1 |
| | | शुद्ध व अशुद्ध शब्द ओळखणे | 1 | 1 |
| 4. | भाषा विशेष | म्हणी | 1 | 1 |
| | | वाक्प्रचार | 1 | 1 |
| | | भाषा विषयक सामान्यज्ञानावर आधारित प्रश्न - लेखक, कवी, संत | 1 | 1 |
| | | समाजसुधारक, प्रसिद्ध व्यक्ती | 1 | 1 |
| 5. | स्व-अभिव्यक्तीचे प्रयत्न | शब्दकोडी / पर्यावरणावर आधारित घोषणा | 1 | 1 |
| | | एकूण प्रश्न | | 35 |

Rough copy

**Section : II** **Subject : English** **Marks: 30**

| Sr. No. | Unit | Sub Units | Max Que. | Min Que. |
|---|---|---|---|---|
| 1 | Letter of Alphabet | 1) Associating the name of a letter with its sound.<br>2) Corelating between capital and small letters.<br>3) Writing the letters of alphabet using proper strokes and proper direction.<br>4) Arranging the letters of alphabet. | 1<br>1<br>1<br>1 | 2 |
| 2 | Vocabulary | 1) Writing familiar words correctly<br>2) Naming objects, things and pictures<br>3) Rhyming words<br>4) Writing opposite words<br>5) Finding out smaller words from the bigger ones.<br>6) Using/writing contracted forms.<br>7) Singular – plural.<br>8) Parts of the body<br>9) Names of birds, animals, their living places and their sounds.<br>10) Names of colours, shapes objects, vegetables fruits, games.<br>11) Action words, Phrases<br>12) Writing related words. | 1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1 | 7 |
| 3 | Numerical Information | 1) Ordinal and cardinal numbers<br>2) Days, Months.<br>3) Clock (Telling Time) | 1<br>1<br>1 | 1 |
| 4 | Punctuation Marks | 1) Capitalization<br>2) Comma<br>3) Full stop<br>4) Question Mark<br>5) Exclamatory Mark | 1<br>1<br>1<br>1<br>1 | 1 |
| 5 | Creative writing | 1) Writing slogans.<br>2) Describing objects, persons<br>3) Mottos and messages.<br>4) Cuttings, pamphlets. | 1<br>1<br>1<br>1 | 1 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | Stock Expressions | 1) Greetings<br>2) Seeking Permission<br>3) Making requests<br>4) Giving responses<br>(positive and negative)<br>5) Co-relation between instructions and expressions with pictures. | 1<br>1<br>1<br>1<br><br>1 | 1 |
| 7 | Word puzzles and riddles | 1) Solving puzzles with the given clues.<br>2) Solving riddles with the given clues. | 1<br><br>1 | 1 |
| 8 | Miscellaneous | 1) Articles<br>('a', 'an', 'the')<br>2) Prepositions -<br>(Word indicating place)<br>3) Adjectives<br>4) Adverbs<br>5) Sentence building<br>6) Description of an event.<br>7) Completion of dialogues. | 1<br><br>1<br><br>1<br>1<br>1<br>1<br>1 | 1 |
| Total Questions | | | | 15 |

# * अभ्यासक्रमातील बदल *

भाषा विषयासाठी -

इ. 1ली ते 4थी च्या अभ्यासक्रमावर आधारित तसेच, इ.4 थी ची काठिण्यपातळी लक्षात घेऊन घटकनिहाय महत्वांश देण्यात आला आहे.

जुना अभ्यासक्रम व पाठयक्रम (इ. 4थी) मधील पुढील उपघटक नवीन पुनर्रचित अभ्यासक्रमात वगळले आहेत.

1) शुद्ध व अशुद्ध वाक्यरचना.
2) पत्राचा मायना दर्शविणारा शब्द.
3) वाक्यांचे भाग (उद्देश व विधेय) ओळखणे.
4) वाक्यांचे प्रकार ओळखणे.
5) शब्दातील अक्षरांपासून नवीन शब्द तयार करणे.
6) अलंकारिक शब्द

तसेच,

पर्यावरणावर आधारित घोषणा हा उपघटक अभ्यासक्रमाशी संबंधित असल्यामुळे नव्याने समाविष्ट केला आहे.

प्रत्यय आणि उपसर्ग लावून तयार होणारे शब्द हा उपघटक शब्द विचार मध्ये समाविष्ट केला आहे.

भाषाविषयक सामान्यज्ञानावर आधारित प्रश्नांमध्ये समाजसुधारक व प्रसिद्ध व्यक्ती यांच्याशी संबंधित प्रश्नांची आखणी करणे हा भाग वाढवला आहे.

English Language (Third) – lower level साठी अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे -

1) पूर्वी दिलेल्या अभ्यासक्रमापेक्षा जास्तीचे घटक/उपघटक खालीलप्रमाणे -

a. action words, phrases.
b. ordinal and cardinal numbers.
c. exclamatory mark.
d. writing slogans.
e. describing objects, persons.
f. mottos and messages.
g. cuttings and pamphlets.
h. giving responses (positive, negative)
i. adverbs
j. Sentence building
k. description of an event.
l. completion of dialogues.

वरील सर्व बाबी नवीन अभ्यासक्रमात आलेल्या असल्यामुळे समाविष्ट केल्या आहेत.

कच्चा मसुदा

# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)

## नमुना प्रश्नपत्रिका

## विषय - भाषा (मराठी) व इंग्रजी

**प्रश्नपत्रिका क्र. I** **माध्यम - मराठी** **गुण - 100**

---

**विभाग - I : भाषा (मराठी)** **गुण - 70**

**प्र. 1 ते 3 खालील उतारा वाचा. त्याखालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय क्रमांक लिहा.**

चिमुकले जपान आज आघाडीवर आहे. प्रत्येक जपानी माणूस राष्ट्रीय वृत्तीने वागतो. आपल्या भारतातील कोकणचा राजा आंबा परदेशात जातो. हापूस आंब्यांची चवच काही न्यारी. सर्व देशातील लोक हापूस आंब्यावर तुटून पडतात. आपला हा आंबा जपानमध्ये देखील जावा अशी भारतीयांची इच्छा. झालं हया आंब्याच्या पेटया जहाजातून जपानला निघाल्या. तिथल्या बोटीवरच्या अधिकाऱ्यांनी आंब्याची चव घेतली आणि सर्व पेटया समुद्रात टाकल्या. भारतीयाला समजेना तो गोंधळून गेला आणि त्याने विचारलं, "आंबा वाईट आहे, आवडला नाही?" जपानी अधिकारी म्हणाला, "आंबे फारच सुंदर आहेत, हे आंबे माझ्या देशवासियांनी खाल्ले तर ते आंब्यावर तुटून पडतील." आमच्या देशातला पैसा तुमच्या देशात जाईल.

**1.** प्रत्येक जपानी माणसाचे वैशिष्टय कोणते?

1) राष्ट्रीय वृत्ती 2) परदेशाबद्दल प्रेम

3) स्वाभिमान 4) चोखंदळ

**2.** आंब्याच्या पेटया परदेशात जाव्यात असे भारतीयांना का वाटत होते?

1) परदेशी अधिकाऱ्यांना खुश करण्यासाठी.

2) जहाजातून प्रवास करायला मिळावा म्हणून.

3) आंबा फळांचा राजा आहे म्हणून.

4) आंबा विकून पैसे मिळविण्यासाठी.

**3.** बोटीवरच्या जपानी अधिकाऱ्यांनी आंब्याची चव घेऊन सर्व पेटया समुद्रात का टाकल्या?

1) आंब्याची चव वाईट आहे म्हणून.

2) आंबे फारच सुंदर आहेत म्हणून.

3) हे आंबे खाण्यासाठी जपानी लोक त्या आंब्यावर तुटून पडतील म्हणून.

4) देशातील पैसा दुसऱ्या देशात जाऊ नये म्हणून.

**प्रश्न.4 ते 6 पुढील कविता वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दया :**

निसर्ग नाते असे जपती
पेराल एक बीज, माती हजार देती.
लावाल कोणी एक, फळे अनेक खाती
धरतीवर वृक्ष, सावली आम्हास देती ।।१।।
वृक्ष किती उंच, जणू वरुणास आळविती
रोपे जरी लहान, मातीस बिलगती
इंद्रधनुचे रंग, फुलास गंध येती ।।२।।
भुरुपे वेगळी असती पर्वत रांगा
घेऊन जन्म इथे, वाहती यमुना-गंगा
भेटून सागराला, मेघास जन्म देती ।।३।।
मृद्‌गंध वाहतो, येता सरी पावसाच्या
पाहून राक्षसी कुऱ्हाड, हाती मानवाच्या
आक्रोश करती वृक्ष, निसर्गही कोपती ।।४।।

**4.** कवितेत निसर्ग कोणाशी नाते जपतो?

1) मानवाशी 2) वरुणाशी 3) मातीशी 4) सागराशी

**5.** 'रत्नाकर' या अर्थाचा कवितेत आलेला समानार्थी शब्द कोणता?

1) सागर 2) निसर्ग 3) मृदगंध 4) मेघ

**6.** मानवाच्या हाती कुऱ्हाड आल्याने निसर्गातील कशाचा ऱ्हास झला?

1) नारळाची झाडे 2) वृक्ष-वेली 3) सुक्या लाकडाचे ओंडके 4) लाकडी साहित्य

**प्रश्न 7 ते 9 खालील संवाद वाचून त्याखलील प्रश्नांची योग्य उत्तरे असलेला पर्याय निवडा.**

"अनिरुद्ध, टि.व्ही. बंद कर,"
"आई, प्लीज थोडा वेळ बघू दे ना."
"नाही, अर्ध्या तासापासून हेच ऐकतेय मी."
"थांब आई, मीच बंद करतो."
"नको ना दादा."
"ऊठ .आता जा खेळायला."
"पण बाहेर किती पाऊस पडतोय!"
"मग सोसायटीच्या हॉलमध्ये जा."
"त्यापेक्षा घरातच सूर्यनमस्कार घाल."
"अगं सरोज, दुपारी कोणी सूर्यनमस्कार घालतात का?"
"आजी, दुपारचे चार वाजले आहेत."
"ए ताई, सारखीच काय रागावतेस माझ्यावर?"
"तुला व्यायामाचे महत्त्व कळावे, म्हणून सांगतेय."

**7.** वरील संवादात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या व्यक्ती किती?
1) चार 2) पाच 3) तीन 4) सहा.

**8.** वरील संवाद केव्हा घडला?
1) टी.व्ही. समोर 2) दुपारी 3) संध्याकाळी 4) सकाळी

**9.** सरोज अनिरुद्धला का रागावली?
1) अनिरुद्ध टी.व्ही. पाहत होता म्हणून.
2) अनिरुद्ध आईचे ऐकत नव्हता म्हणून.
3) अनिरुद्धला व्यायामाचे महत्त्व कळावे म्हणून.
4) अनिरुद्धने सूर्यनमस्कार घालावे म्हणून.

**प्रश्न 10 ते 12 रिकाम्या जागी योग्य शब्द भरुन सुसंगत परिच्छेद तयार करा.**

**10.** मांजराचे छोटेसे गोजिरवाणे -------- रस्त्याच्या कडेला पडले होते.
1) बाळ 2) शावक 3) करडू 4) पिलू

**11.** पिलाच्या पायातून थोडेसे ---------- आलेले मला दिसले.
1) अश्रू 2) रक्त 3) ओघळ 4) पाणी

**12.** मी त्याच्या जखमेवर --------- लावली.
1) मीठ 2) औषध 3) हळद 4) मलम

**13.** खालीलपैकी विशेषण असणारा पर्याय शोधा.
1) पोलादी 2) चाकर 3) गरिबी 4) अंधार

**14.** 'आपणास उदंड आयुष्य मिळो!' या वाक्यातील नाम असणारा पर्याय ओळखा.
1) आपणास 2) उदंड 3) आयुष्य 4) मिळो

**15.** खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी नाम ओळखा.
1) ठोके 2) खोके 3) झोके 4) बोके

**16.** खालीलपैकी स्त्रीलिंगी असलेला शब्द ओळखा.
1) तबक 2) प्रहर 3) कसरत 4) सूर

**17.** 'तो चिमटा घेऊन घरी परतला.' या वाक्यातील काळ ओळखा.
1) वर्तमानकाळ 2) भविष्यकाळ 3) भूतकाळ 4) साधा काळ

**18.** ते आर्जवाने म्हणाले, "मला दिसत नाही, पलीकडे पोहोचवता का?"
वरील वाक्यामध्ये किती प्रकारची विरामचिन्हे आली आहेत?
1) तीन 2) चार 3) पाच 4) दोन

**19.** खालीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा.
1) ठराविक 2) मेजवानी 3) तरतूद 4) पोलिस

**20.** '**भूमिगत होणे**' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा.
1) पसार होणे 2) पळून जाणे 3) लपून राहणे 4) जमिनीत लपणे

**21.** खाली दिलेल्या चौकटीतील अक्षरांपासून तयार होणाऱ्या म्हणीतील पाचवे अक्षर कोणते?

| ग | अ | त | ल | य | टा | गा | पा | पो | गो | य | न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

1) पा 2) ग 3) गा 4) य

**22.** '**अंधार**' या शब्दाचा समानार्थी शब्द निवडा.
1) तमा 2) तम 3) प्रकाश 4) तामस

**23.** '**आळशी**' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.
1) प्रेमळ 2) उत्साह 3) उद्योगी 4) उद्धट

**24.** खाली दिलेल्या शब्दकोडयात रिकाम्या जागी कोणती अक्षरे घातल्यास सर्व शब्द अर्थपूर्ण बनतील?

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| व | व | व | व |

1) धा,भा,टा,का 2) ना,सा,डा,भा
3) हा,जा,धा,फा 4) का,रा,ना,ढा.

**25.** खालीलपैकी कोणता पर्याय जोडशब्द नाही?
1) जाडा भरडा 2) पांढरेशुभ्र 3) तंटाबखेडा 4) पालापाचोळा

**26.** जसे साधूंचा जथा तसे, लमाणांचा -------------
1) घोळका 2) तांडा 3) जमाव 4) ताफा

**27.** खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.
1) कोल्हा - कोल्हेकुई 2) हत्ती - चीत्कार
3) साप - फूत्कार 4) चिमणी - कलरव

**28.** शब्दसमूहाबद्दल योग्य शब्द लिहा.
शोध लावणारा -------
1) गुप्तहेर 2) वार्ताहर 3) पत्रकार 4) संशोधक

**29.** 'व, ड, क, सा' या अक्षरापासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दातील शेवटचे अक्षर कोणते?
1) व 2) ड 3) क 4) सा

**30.** 'प्रयत्न, प्रयास, प्रमाण, प्रवास, प्रसिध्द' हे शब्द शब्दकोशातील वर्णानुक्रमे लावल्यास तिसरा शब्द कोणता येईल?
1) प्रमाण 2) प्रवास 3) प्रयत्न 4) प्रयास

**31.** '**तीर**' या शब्दाचे दोन भिन्न अर्थ असलेला योग्य पर्याय ओळखा.
1) पाठ, कमान 2) धनुष्य, दोरी
3) बाण, नदीचा काठ 4) बाण, धनुष्य

**32.** उपसर्ग नसणारा शब्द ओळखा.
1) आशीर्वाद 2) आमरण 3) आभूषण 4) आसक्त

**33.** प्रत्यय असणारा शब्द ओळखा.
1) सुविचार 2) गिरणी 3) प्रोत्साहन 4) गुलामगिरी

**34.** 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा।.... ' ही रचना खालीलपैकी कोणत्या संताची आहे?
1) संत तुकाराम 2) संत ज्ञानेश्वर
3) संत चोखामेळा 4) संत शेख महंमद

**35.** '**रयत शिक्षण संस्था**' कोणी स्थापन केली?
1) स्वामी विवेकानंद 2) रवींद्रनाथ टागोर
3) कर्मवीर भाऊराव पाटील 4) महाराजा सयाजीराव गायकवाड

## विभाग - II : English

Marks - 30

**36.** खालील दिलेल्या कोणत्या पर्यायामध्ये इंग्रजी अल्फाबेट चा क्रम चुकीचा आहे?

1. p r q s t u
2. l m n o p q
3. h i j k l m
4. c d e f g h

**37.** **'स'** या ध्वनीशी निगडीत नसलेला शब्द पर्यायातून शोधा.

1. cement
2. cycle
3. clean
4. cereals

**38.** जर 'blackboard' शी निगडीत 'duster' हा शब्द असेल तर 'farm'शी निगडीत शब्दाचा पर्याय कोणता?

1. play  2. plough
3. bird  4. dust

**39.** खाली दिलेल्या शब्दापैकी अर्थपूर्ण असणाऱ्या शब्दाचा पर्याय कोणता?

1. divigion  2. curent  3. casle  4. goddess

**40.** सोबत दिलेल्या चित्रासाठी कोणती अभिव्यक्ती योग्य ठरेल?



1. How Sweet!
2. Great!
3. Oh no!
4. What a surprise!

**41.** खाली दिलेल्या पर्यायातील चुकीचा पर्याय कोणता?

1. I' ve - I have.
2. She's - She is.
3. Let's - Let is.
4. I' m - I am.

**42.** ग्रेगरियन वर्षाची सुरुवात खालीलपैकी कोणत्या महिन्याने होते?

1. December 2. July
3. June 4. January

**43.** 'hard' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्दाचा योग्य पर्याय कोणता?

1. short 2. soft 3. thin 4. big

**44.** शेजारील चित्रात दर्शविलेला खेळ खालीलपैकी कोणता?

1. hide and seek
2. hopscotch
3. tipcat
4. marbles



**45.** रिकाम्या जागी पर्यायातून योग्य शब्द निवडा.

जसे - a red apple.
तसे - -------- giraffe.

1. a kind 2. a round
3. a tall 4. a wide

**46.** खाली दिलेल्या शब्दकोडयासाठी (Riddle) योग्य पर्यायाची निवड करा.

I live in jungle.
I swing and jump.
I like to eat groundnuts.
Who am I?

1. a lion 2. a tiger
3. a monkey 4. a deer

**47.** ---------- Sun shines brightly in the sky.
रिकाम्या जागी योग्य शब्द कोणता?

1. A 2. An 3. The 4. So

**48.** खाली दिलेल्या वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह योग्य ठरेल त्याचा पर्याय निवडा.

But will I wait? Oh no

1. ! 2. ?
3. . 4. ,

**49.** सोबत दिलेल्या शब्दापासून अर्थपूर्ण होणारा शब्द पर्यायांतून निवडा.

**Golden**

1. gode
2. gen
3. ned
4. gold

**50.** खालील पर्यायांपैकी message असलेला योग्य पर्याय निवडा.

1. Keep this place dirty.
2. Save electricity.
3. Be kind to thieves.
4. Be cruel.

कच्चा मसुदा

# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)

## उत्तरसूची

**पेपर क्र : I** **विषय : भाषा(मराठी) व इंग्रजी**

| प्रश्न क्र. | उत्तर पर्याय क्र. | प्रश्न क्र. | उत्तर पर्याय क्र. |
|---|---|---|---|
| 1. | 1 | 26. | 2 |
| 2. | 4 | 27. | 4 |
| 3. | 4 | 28. | 4 |
| 4. | 3 | 29. | 4 |
| 5. | 1 | 30. | 4 |
| 6. | 2 | 31. | 3 |
| 7. | 2 | 32. | 1 |
| 8. | 2 | 33. | 4 |
| 9. | 3 | 34. | 3 |
| 10. | 4 | 35. | 3 |
| 11. | 2 | 36. | 1 |
| 12. | 3 | 37. | 3 |
| 13. | 1 | 38. | 2 |
| 14. | 3 | 39. | 4 |
| 15. | 2 | 40. | 3 |
| 16. | 3 | 41. | 3 |
| 17. | 3 | 42. | 4 |
| 18. | 1 | 43. | 2 |
| 19. | 4 | 44. | 1 |
| 20. | 3 | 45. | 3 |
| 21. | 4 | 46. | 3 |
| 22. | 2 | 47. | 3 |
| 23. | 3 | 48. | 1 |
| 24. | 2 | 49. | 4 |
| 25. | 2 | 50. | 2 |